ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 10 | July - 2016

International Online Multidisciplinary Journal
Review of Research
ISSN No : 2249-894X
Impact Factor : 3.1402 (UIF) [2015]
Save Tree, Save Paper, Save World

Review Of Research

# भारतातील रोजगार हमी योजनेचा चिकित्सक अभ्यास

प्रा. किशोर हरिष धोटे
अर्थशास्त्र विभाग , धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर.

## प्रस्तावना



भारत हा कृषी प्रधान देश असून बहुतांशी जनता ही शेतीवरच आपली उपजिविका पूर्ण करतात. परंतू भारतातील शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे वर्षातून केवळ पाच ते सहा महिनेच शेतीमध्ये कामे सुरु असतात आणि त्यानंतरच्या महिन्यामध्ये लोकांना रोजगार न मिळण्याची समस्या निर्माण होते. या समस्येवर उपाय म्हणून महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यात १९७२ ला रोजगार हमी योजना प्राथमिक स्वरुपात सुरु करण्यात आली. व १९७७ पासून एक अधिनियम काढून ही योजना संपूर्ण महाराष्ट्राभर सुरु करण्यात आली. या योजनेचा प्रमुख उद्देश म्हणजे मागेल त्याला काम पुरविणे आणि त्यांना रोजगाराची हमी देणे हा या योजनेचा महत्वाचा हेतू असल्यामुळे ग्रामीण भागाचा विकास करण्याकरीता हि योजना पुरक असल्याचे दिसून येते. या योजनेद्वारे बहुतांश लोकांचे उपजिविकेचे साधन असलेली शेती, पायाभूत रस्ते, सिंचनाचे कामे, पारंपारिक पिकाऐवजी फळ लागवड, पेयजलाची पूर्तता करण्यात येवू लागली. या योजनेची यशस्वीता पाहता ५ सप्टेंबर २००५ रोजी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम तयार करुन २ फेब्रुवारी २००६ पासून भारतामध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची सुरुवात करण्यात आली.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

१)लोकांच्या आर्थिक परिस्थितीत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
२)राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या उद्दिष्ट्यांचा अभ्यास करणे.

## रोजगार हमी योजनेची पार्श्वभुमी

सन १९५१ मध्ये भारतात नियोजनाला सुरुवात झाली. नियोजनाच्या सुरवातीला देशातील दारिद्र्य व बेकारी कमी करण्याच्यादृष्टीने प्रयत्न करण्यात आले होते. परंतु नियोजनाच्या काळामध्ये पाहिजे त्या प्रमाणामध्ये यश मिळाले नाही. म्हणून ग्रामीण जनता रोजगारीच्या शोधामध्ये शहराकडे धाव घेऊ लागली. परिणामत: शहरामध्ये झोपडपट्याची वाढ घडून आली. ज्या प्रमाणामध्ये रोजगारासाठी खेड्यातील जनता शहराकडे स्थलांतरीत झाली त्यानुसार शहरामध्ये रोजगाराची उपलब्धता होऊ शकली नाही. परिणामत: शहरामध्ये दारिद्र्यी व बेकारीची समस्या मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे ग्रामीण भागातच रोजगारीच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजे असा विचार व्यक्त करण्यात आला. परंतू याबाबत निश्चित स्वरुपाची योजना सुचविण्यात आली नाही. या संदर्भात महाराष्ट्राचे तत्कालीन विधान परिषदेचे अध्यक्ष एक प्रसिद्ध विचारवंत श्री. वि. स. पागे यांनी १९६९ ला एक योजना आखली व ती प्रत्यक्ष कृतीमध्ये उतरविण्याच्या दृष्टीने सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील विसापूर गावात सुरु केली.

नंतरच्या काळात ही योजना आठ गावामध्ये सुरु केली. त्यामध्ये बागायत, विहीर खोदणे, कुटीर उद्योग असे उद्योग सुरु करुन ग्रामीण भागातील लोकांच्या शहराकडे जाण्याच्या प्रवृत्तीस आळा बसू शकतो. या योजनेच्या आधारे त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी एकत्रित योजना तयार केली. या योजनेलाच 'पागे योजना' म्हणतात. पुढे ही योजना राज्याच्या वेगवेगळ्या भागात लागू केली. प्रथम प्रयोग म्हणून १९७० मध्ये 'रोजगार हमी योजना' राज्याच्या काही भागात लागू केली याच काळात बेकारीची तिव्रता लक्षात घेता ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना अंगमेहनतीचे काम करणाऱ्या मजूरांना रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने विचार केला गेला. सन १९७२ साली महाराष्ट्रात अवर्षामुळे दुष्काळी परिस्थिती होती. त्यामुळे योजनेतून लोकांना उत्पादक कामे पूरविता आले नाही. म्हणून १९७२.७३ या वर्षात रोजगार हमी योजनेची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी झाली नसल्याचे दिसून येते म्हणून २० सप्टेंबर १९७४ योजी महाराष्ट्र राज्याने सर्वपक्षीय बैठक घेतली. या बैठकीमध्ये रोजगार हमी योजनेवर चर्चा केली आणि पून्हा नव्या उत्साहाने रोजगार हमी योजना जाहीर केली.

तसेच १९७५ साली रोजगार हमी योजनेचे उद्देश, कार्यपद्धती ठरवून ही योजना दीर्घकाळ चालू राहण्यासाठी स्वतंत्र उपकर बसवून स्वतंत्र निधी उभारण्यात आला हा सर्व दस्तऐवज एकत्र करुन सविस्तर असा 'रोजगार हमी योजना कायदा' सन १९७७ मध्ये करण्यात आला. या कायद्याची अंमलबजावणी २६ जानेवारी १९७९ पासून करण्यात आली. महाराष्ट्रात गेल्या ३६ वर्षामध्ये सुरु असलेल्या रोजगार हमी योजनेचे यश पाहून याच धर्तीवर केंद्र सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना २००६ वर्षी लागू केली आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास घडून आणण्यासाठी व त्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक विकासाच्या उद्देशाने त्यांच्या आयुष्यात अमूलाग्र बदल करण्याच्या दृष्टीकोनातून भारत सरकारने प्रत्येकाला रोजगार देण्यासाठी एक महत्वकांक्षी निर्णय घेऊन २ फेब्रुवारी २००६ ला 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा' लागू केला. आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा समारंभ करण्यात आला. सर्व प्रथम ही योजना २०० जिल्ह्यात सुरु करण्यात येऊन दुसऱ्या टप्प्यात २००७.०८ ही योजना देशातील अर्वरीत १३० जिल्ह्यात लागू करण्यात आली. नंतर २८ सप्टेबर २००७ ला भारत सरकारने एक अधीसुचना काढून ही योजना देशभर लागू करण्याचा निर्णय घेऊन दिनांक १ एप्रिल २००८ पासून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना देशातील सर्व ६१४ जिल्ह्यात लागू करण्यात आली. भारत सरकारने महात्मा गांधी यांच्या जन्म दिवसावर २ ऑक्टोबर २००९ पासून या योजनेचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे नामकरण करण्यात आले.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची उद्दिष्ट्ये

१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेद्वारे अकुशल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक कुटूंबातील प्रौढ व्यक्तीला योजनेअंतर्गत १०० दिवस प्रतिकुटूंब रोजगारीची हमी देण्यात आली आहे.

२) या योजनेच्या माध्यमातून स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे हे या योजनेचे महत्वाची उद्दिष्ट्ये आहे.

३) अधिनियमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतीवर काम करणारे शेतमजूर यांना रोजगारीचा हक्क प्रधान करुन त्यांना रोजगारीची हमी देण्यात आली आहे.

४) ग्रामीण भागातील शेतमजूरांना तसेच शेतकरी कुटूबांना सामाजिक सुरक्षा प्रदान करणे व महीला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे तसेच पंचायत राज संस्थाचे बळकटीकरण करण्यावर योजनेत भर देण्यात आला आहे.

५) योजनेद्वारे करण्यात येणारी कामे एकूण किंमतीच्या ६० टक्के कामे, ही उत्पादक स्वरुपाची असली पाहीजे. त्यामध्ये भूमीची उत्पादकता वाढविणे, जलव्यवस्थापन करणे, वृक्षलागवडीस वाव देणे तसेच नरेगाद्वारे करण्यात येणारी कामे कृषी व कृषी संलग्न क्षेत्राच्या विकासाशी निगडीत असली पाहीजे.

६) योजनेअंतर्गत किमान १/३ महीलांची नोंदणी करुन त्यांना काम देणे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची वैशिष्ट्ये

१) मनरेगा योजना अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीला म्हणजेच १८ वर्षावरील प्रौढ व्यक्तींना केंद्र सरकारद्वारे १०० दिवस प्रतिकुटूंब रोजगाराची हमी दिलेली आहे. जर १०० दिवसापेक्षा जास्त रोजगार द्यायचे असेल तर त्यांची संपूर्ण जबाबदारी राज्य सरकारची राहील.

२) योजनेमध्ये जलसंधारण, जलसंवर्धन, दुष्काळ प्रतिबंधक कामांना प्राधान्य राहील.

३) एकूण कामाच्या ५० टक्के कामे ग्रामपंचायतीद्वारे राबविले जातात.

४) ग्रामपंचायतीचे कामे करणे सुकर व्हावे म्हणून बाह्य:स्थ पद्धतीने मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात येते त्याअंतर्गत ग्रामसेवकाला मदत करण्यासाठी ग्रामरोजगार सेवक व कंप्पूटर ऑपरेटर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

५) मनरेगाद्वारे करण्यात येणाऱ्या कामांना मंजूरी देणे सुलभ व्हावे म्हणून तांत्रिक व प्रशासकीय अधिकार शासनाद्वारे विविध स्तरावरुन देण्यात आले आहे.

६) मजूरांना मनरेगामध्ये मजूरी मिळविण्यासाठी जॉबकार्ड ग्रामपंचायतीकडे अर्ज करुन मिळविणे आवश्यक आहे.

७) मजूरांना १५ दिवसाच्या आत जॉबकार्ड देणे बंधनकारक आहे.

८) जॉबकार्ड देताना प्रत्येक कुटूंबाला विनामूल्य फोटोसह एक जॉबकार्ड देणे आवश्यक आहे.

९) कामाची मागणी करताना मजूरांचे किमान १४ दिवस कामाची मागणी करणे आवश्यक आहे.

१०) मनरेगा अंतर्गत कामाची मागणी केल्यानंतर १५ दिवसात ग्रामपंचायतीने रोजगार पूरविणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीनी १५ दिवसामध्ये रोजगार पूरविला नाही तर बेरोजगारी भत्ता द्यावा लागतो.

११) कामाच्या मागणीबाबत ग्रामपंचायतीने गटविकास अधिकारी यांना तात्काळ माहिती द्यावी.

१२) कामगारांना गावापासून ५ किलोमीटरच्या आतच कामाची उपलब्धता करुन द्यावी. ५ किलोमिटरपेक्षा जास्त अंतर असेल तर येण्याजाण्याचा खर्च देण्यात यावा, अशी तरतूद करण्यात आली आहे.

१३) ग्रामपंचायतीद्वारे गावातील पूर्ण कामाचे नियोजन केल्या जाते.

१४) काम केल्यावर जास्तीत जास्त १५ दिवसात मजूरीचे वाटप करण्यात यावे.

१५) एका ग्रामपंचायत स्तरामध्ये काम करण्यासाठी कमीत कमी १० मजूर आवश्यक असतात पण डोंगराळ भाग व वनीकरण कामासाठी ही अट शिथिल आहे.
१६) योजनेमध्ये करण्यात येणारी कामे कंत्राटद्वाराशिवाय करणे बंधनकारक आहे.
१७) मजूरामार्फत करण्यात येणाऱ्या कामावर मशीनरी लावता येणार नाही.
१८) राज्य शासनाला सल्ला देणारी महाराष्ट्र रोजगार हमी परिषद महत्वाचे काम करत असते.
१९) योजनेसंबधी सर्व माहीती कामावर, ग्रामपंचायत, वेबसाइटवर उपलब्ध करुन देणे.
२०) कामाचे सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता कामामध्ये आहे.
२१) योजनेसंबधी असणाऱ्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी अधिकारी वर्ग आहेत.

## निष्कर्ष

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये सन २००६.०७ मध्ये रोजगाराची मागणी केलेल्या कुटूंब संख्येला ९९.१८ टक्के रोजगार पुरविण्यात आला. परंतु त्यानंतरच्या काही वर्षामध्ये कुटूंबाला रोजगार पुरविण्याची टक्केवारी सतत कमी होत आहे. या योजनेमागील सरकारची प्रमुख भूमिकेअंतर्गत ग्रामीण बेरोजगारी दूर करणे, दारिद्र्याचे प्रमाण कमी करणे, ग्रामीण भागात राहणाऱ्या जनतेचे राहणीमान उंचावणे, ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण कमी करणे, ग्रामीण जनतेला रोजगार उपलब्ध करुन देणे, ह्या रोजगाराच्या सरकारच्या योजना सुरु करण्यामागच्या भूमिका सफल होतांना दिसून येत नसल्या तरी काही प्रमाणात बेकारीचे व दारिद्र्याचे प्रमाण कमी होण्यात मदत झाली आहे. यामागचे कारणे म्हणजे १०० दिवस रोजगार देण्याचे योजनेचे लक्ष असले तरी १०० दिवसापेक्षा कमी प्रमाणात रोजगार दिल्यामुळे कामगारांच्या स्थितीमध्ये अपेक्षित बदल दिसून आला नाही. परिणामत: सरकारची योजनेमागची भूमिका या ठिकाणी पूर्णत: फलीत होतांना दिसून येत नसली परंतु त्यातील काही त्रुटी दुरुस्त केल्यास योजनेचे उद्दिष्ट साध्य करता येते.

## संदर्भग्रंथ सूची

१. ताम्हणे चंद्रकांत (१९७५), "रोजगार हमी योजना", रोजगार पाक्षीक, वर्ष ३, अंक १९.
२. पागे वि. स. (१९९८), "बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास", यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, मुंबई.
३. शिंद अशोक (२००८), 'पारदर्शकता आणि जबाबदारीसाठी सामाईक नियंत्रणाची गरज',योजना मासिक.
४. पवार अशोक (२००८), राष्ट्रीय रोजगार हमी योजना, दृष्टिकोन : अरुणाचल प्रदेश, योजना मासिक, वर्ष ३६, अंक ५, डिसेंबर.
५. गांगुर्डे किशोर (२००८), 'हमी रोजगाराची साथ केंद्राची', लोकराज्य अंक — २, वर्ष ६०, एप्रिल.
६. चव्हाण हिरालाल (२००९), 'राष्ट्रीय रोजगार हमी कायदा : एक दृष्टिक्षेप', योजना विशेषांक, वर्ष ३६, अंक ६, जानेवारी.
७. साधने दिलीप (२०१२), 'रहयोचा कायापालट सर्वांगिण प्रगतीची तीन वर्ष', लोकराज्य पाक्षीक, वर्ष ६४, अंक ८, नोव्हेंबर.
८. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र शासन जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर माहिती पुस्तीका.
९. मनरेगाची यशोगाथा, वार्षिक अहवाल (२०१५) माहिती पुस्तीका.
१०. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारंटी अधिनियम २००५ (२०१३), आवृत्ती चौथी, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.